Vol II Issue X

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.10,Nov. 2012
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# भारतातील सहकारी चळवळीचा विकास

*प्रदीप डी. घोरपड, रेकचंद ग. गोंगले*

एम.कॉम., एम.ए. (अर्थ), एम.फील., पीएच.डी. शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली
एम.कॉम., एम.फील.स्नातकोत्तर वाणिज्य विभागनबीरा महाविद्यालय, काटोल, जि. नागपूर

**सारांश :**

जगातील इतर देशाप्रमाणेच भारतातील सहकारी चळवळीचा विकास देखील ग्रामीण भागातील जनतेच्या दारिद्रयातुन व पिळवणूकीतून झाला. १८ व्या आणि १९ व्या शतकात इंग्लडमध्ये झालेल्या आद्योगीक क्रांतीचे दुष्परिणाम भारतातील खेड्यापाड्यातून, घराघरातून चालणाऱ्या लहान लहान अद्योगधंद्यावर झाले. इंग्लडमधुन भारतात येणाऱ्या कारखानदारी वस्तूबरोबर यशस्वीरीत्या स्पर्धा करणे भारतील अनेक लघु व कुटिर-उद्योगांना शक्य झाले नाही. परिणामी अनेक कुटिर-उद्योग बंद पडल्यामुळे त्या ठिकाणचे अनेक कारागीर बेकार झाले.

प्रस्तावना :

उदरनिर्वाहासाठी हे लोक शेती व्यवसायाकडे वळले. शेतीवर अवलंबुन असणाऱ्यांची संख्या वाढली. अवर्षण व वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा वाढत गेला. अनेक शेतकरी कर्जबाजारी होऊन सावकारी पाशात अडकून पडले. जमिनीच्या तारणावर काढलेले कर्ज परत करणे अशक्य झाल्यामुळे कित्येक शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांनी गिळंकृत केल्या. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे जीवन गुलामांच्या पातळीवर येऊन पोहचले होते.

भारतात सहकारी पतसंस्थांचा उगम होण्यास ग्रामीण शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व सावकाराद्वारे होणारी पिळवणूक कारणीभुत आहे. १९ व्या शतकाच्या शेवटच्या कालखंडात सहकारी पतसंस्थांची स्थापना झाली. सर्वप्रथम भारतात मुंबई प्रांतातील पुणे जिल्ह्यात पुरंदर तालुक्यात शेतकरी बँक स्थापण्याचा प्रयत्न झाला, तर ५ फेब्रुवारी १८८९ ला मुंबई प्रांतातील बडोदा येथे प्रा. विठ्ठल कवडेकर यांनी ''अन्योन्य सहकारी संस्था'' कामगारांच्या एकत्रीत मदतीने स्थापन केली. त्यानंतर ८ मे १९०५ ला जिल्हा धारवड येथिल 'कणगीहल' येथे ग्रामीण सहकारी पत संस्था स्थापन झाली.

डॉ. विल्यम किंग हे ओवेनचे इंग्लडमधील अनुययायी होते. ओवेनच्या विचारांचा प्रचार करण्याचे कार्य डॉ. किंग यांनी केले. ''कामगारांना प्रारंभीच्या उपायांनी आपल्या सिमेपलिकडील भांडवलाशिवाय सुरक्षित व स्वावलंबी समाज घडविता येते.'' याबद्दल जनतेला मार्गदर्शन म्हणून सन १८१८ मध्ये डॉ. किंग यांनी ''दि को.ऑपरेटीव्ह'' नावाने एक मासिक प्रसिध्द करण्यास सुरुवात केली. या सहकार नियतकालीकाने सबंध विश्वातील सहकारी चळवळीमध्ये एका नव्या युगाचा प्रारंभ केला व या क्षेत्रामधील प्रवासाला त्यामुळे सुरुवात झाली. किंगच्या मते, लहान लहान संस्था संघटित करण्यावर त्यांचा भर होता. सन १८२७ मध्ये इंग्लडमध्ये 'ब्रिटन को-ऑपरेटीव्ह बिनेवॉलंट असोसिएशन' व 'को-ऑपरेटीव्ह ट्रेड युनियन असोसिएशन' या संस्था स्थापन झाल्या व सहकारी चळवळीचा विकास होत गेला.

सर्वप्रथम भांडवलशाहीचा पर्याय म्हणून इंग्लडमध्ये १८४३ मध्ये ओवेनच्या विचारसरणीचे २८ विचारवंत (विणकर) एकत्र आले. पुर्वीचा अनुभव लक्षात घेता सहकारी तत्वावर भांडार सुरु करण्याचे ठरवितांना भांडारातून रोख व्यवहारच केले जातील. बाजारभावाप्रमाणेच वस्तुच्या किंमती असतील तसेच जे संस्थेबाबत प्रामाणिक असतील त्यांनाच संस्थेचे सभासदत्व दिले जाईल इत्यादी गोष्टी निश्चित करण्यात आल्या आणि याबरोबरच २८ सभासदांनी वर्षाला एक पौंड बचत करुन २८ पौंड जमा केले व १५ ऑगस्ट १८४४ मध्ये 'रॉशडेल इक्विटेबल पायोनियर्स सोसायटी' स्थापन केली. संस्थेने रोडलेन येथे एक जागा दुकानसाठी भाड्याने घेतली व संस्थेचा व्यवसाय सुरु केला. इंग्लड हे सहकारी चळवळीचे जन्मस्थान आहे. या संसथेने गरजवंताच्या गरजा भागविण्यासाठी सहकारी संस्था स्थापन केल्या असल्या तरी जगाच्या पाठीवर सहकारी चळवळीस एक सुत्रात आणण्यासाठी १८९५ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची स्थापना केली व जगातील सहकारी चळवळी संलग्न झाल्या.

## *उद्दिष्ट्ये :*

समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या व्यक्तीच्या गरजा भागविण्याच्या उद्देशाने नागरी सहकारी पतसंस्था प्रामुख्याने अस्तित्वात आल्यात. कारण समाजातील मध्यम उत्पन्नाचे लोक व्यापारी, नोकरदार व्यक्ती तसेच धंद्यांची वाढ करणे व नवीन व्यवसाय सुरु करणे इत्यादी कारणासाठी नागरी सहकारी पतसंस्था अस्तित्वात आल्या असुन ज्याच्याजवळ पत नाही किंवा तारण देण्यासाठी काही मालमत्ता नाही अशा आर्थिकदृष्टया दुर्बल असणाऱ्या व्यक्तींना हातगाडी चालविणारे, फळ विक्रेते, भाजीपाला विक्रेते, परीट, छोटे चर्मोद्योग करणारे, कुटीर व लघुउद्योग करणारे, किराणा दुकानदार इत्यांदीना पतपुरवठा करुन त्यांच्या व्यवसायाच्या व त्यांचा आर्थिक विकास साधण्याच्या उद्देशाने नागरी सहकारी पत संस्थांची स्थापना करण्यात आली आहे. नागरी सहकारी पतसंस्थांना पर्यायी संस्था म्हणून शहरी विभागातील आर्थिकदृष्टया दुर्बल व्यक्तींना पतवान बनवून आर्थिकदृष्टया त्यांना सक्षम व स्वयंनिर्भर बनविणे हा या संस्थांच्या स्थापनेचा प्रमुख उद्देश आहे.

नागरी पतसंस्थांच्या संख्येत वाढ व त्यांच्या कार्याचा व्याप वाढला त्यांच्या समोर विविध अडचणीही निर्माण झाल्या. याची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

१) कर्जाची थकबाकी    २) चुकीच्या कर्जवाटपाचे धोरण
३) अकार्यक्षम व्यवस्थापन    ४) सभासद, पदाधिकारी आणि कर्मचारी यांची अनास्था प्रवृत्ती

या सर्व कारणामध्ये महत्वाचे कारण म्हणजे व्यवस्थापन होय. कोणत्याही संस्थेचे व्यवस्थापन योग्य असेल तर त्या संस्थेचा विकास होतो व व्यवसाय उन्नतीकडे जाते.

## *भारतातील सहकारी चळवळीचा कालखंड :*

भारत देशामध्ये सहकारीतेच्या तत्वाचा जो भलामोठा चौसोपी इमला उभा राहिलेला दिसतो आहे त्याचा पायथ्याचा पहिला दगड २५ मार्च १९०४ रोजी ठेवला गेला. त्याला २५ मार्च २००४ रोजी बरोबर शंभर वर्षे पूर्ण झाले आहेत. शंभर वर्षापूर्वी याच दिवशी सहकारीतेच्या तत्वाला राजमान्यात देणारा पहिला कायदा अस्तीत्वात आणला जाऊन सहकारी पतसंस्था गठीत करण्याचा मार्ग खुला करुन दिला गेला.

भारतातील सहकारी चळवळीचा कालखंड खालिलप्रमाणे आहे.

१) स्वातंत्र्यपूर्व काळ - (१९०४-१९४७)
२) स्वातंत्र्योत्तर काळ - (१९४७-१९९१)
३) उदारिकरणाच्या धोरणानंतरचा काळ - (१९९१ नंतरचा)

### *१)स्वातंत्र्यपूर्व काळ (१९०४-१९४७) :*

भारतीय सहकारी चळवळीचा उगम ब्रिटश राजवटीत झाला. इंग्लडमध्ये १८२५ साली उपभोक्ता सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. परंतु भारतात ब्रिटीश सरकाराच्या पुढाकारातून सहकारी संस्थेची स्थापना झाली. सावकारी पाश अतिशय जाचक झाल्यामुळे १९ व्या शकतकाअखेर मुंबई प्रांतातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर दंगे, जाळपोळ व लुटालुट होऊ लागली. त्याला आळा घालण्यासाठी सावकाराला पर्याय म्हणून सहकारी संस्था स्थापन करव्यात अशी कल्पना पुढे आली. अशाप्रकारच्या संस्था जर्मनीत अस्तित्वात असल्याने त्यांचा अभ्यास करण्यासाठी 'सर फ्रेडरिक निकोल्सन' या सनदी अधिकाऱ्याला ब्रिटीश सरकारने जर्मनीस पाठविले. त्यांनी परत आल्यावर त्यांनी सहकारी तत्व हाच मार्ग शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी योग्य असल्याचे मत व्यक्त केले.

त्याचप्रमाणे 'ग्रामीण पतपुरवठ्याच्या समस्येचा' अभ्यास करण्यासाठी सन १९०० मध्ये 'सर एडवर्ड लॉ' यांची नियुक्ती झाली. त्यांनी सहकारी पतपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करण्यास उत्तेजन देण्याची व भारतात शहरी व ग्रामीण पतपुरवठा सहकारी संस्थांची रचना व कार्यपध्दती कशी असावी याविषयी मार्गदर्शन करणारा कायदा करण्याची शिफारस त्यांनी केली. या सुचनेनुसार सन १९०४ साली ''सहकारी पतपुरवठा संस्था विषयक कायदा'' करण्यात आला. या सहकारी कायद्यानेच सहकारी चळवळीची मुहूर्ममेढ भारतात रोवली गेली. ''हेन्री डब्ल्यु. वुल्फ'' यांनी म्हटल्याप्रमाणे भारतातील सहकारी कायद्यामुळे या देशाचा सामाजिक व आर्थिक इतिहासाला नवे वळण लागले. (It was a turning point in economic and social history).

भारतातील सहकार चळवळ जरी १९०४ साली सुरु झाली असली तरी स्वातंत्र्यपूर्व काळात सहकारी चळवळीने भारतात खऱ्या अर्थाने विकास केला नव्हता कारण सहकारी चळवळ मुख्यत: शेतकऱ्यांना केल्या जाणाऱ्या कर्जपुरवठ्याच्या कार्यापुरतीच मर्यादीत होती. सन १९०४ ते १९११ या काळातील सहकारी चळवळीतील अनेक दोष व उणिवा लक्षात घेऊन सहकारी कायद्यात दुरुस्ती करण्याची आवश्यकता भासली व सन १९१२ मध्ये नविन सहकारी कायदा करण्यात आला.

पहिल्या महायुध्दानंतर भारत सरकारने सन १९१९ मध्ये सहकारी संस्थाविषयक नविन अधिनियम केला. या नविन अधिनियमानुसार सहकारी चळवळीच्या विकासाची जबाबदारी त्या त्या राज्यशासनावर सोपविण्यात आली. या काळात भारतातील सहकारी चळवळीस चालना मिळण्याची दोन कारणे सांगता येतील. एक तर राज्य शासनानी सहकारी चळवळीकडे खास लक्ष दिले व सहकारी संस्थाच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले. दुसरे म्हणजे युध्दोत्तर काळात अर्थव्यवस्थेत टंचाई होती. परिणामी अनेक संस्था स्थापन झाल्या. सहकारी चळवळीत पोषक असे कायदे मुंबई राज्यशासनाने केले. या कायद्यानुसार ग्रामीण भागात सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन झाल्या. हळूहळू त्यांची संख्या वाढत गेली. मुंबईतील सहकारी पतपुरवठा संस्था या केंद्रीय बँकेशी सलग्न झाल्या. प्रातीय बँका व ग्रामीण पतपुरवठा संस्था यातील दुवा म्हणुन काही जिल्हास्तरीय बँकाही काम करु लागल्या. त्यांचेच अनुकरण इतर राज्य शासनाने केले. त्यामुळे सहकारी संस्थांची संख्यात्मक प्रगती खुप झाली.

सन १९४४ मध्ये प्रा. डी.आर. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने भारतातील सहकारी चळवळीची भूमिका विषद करतांना सांगितले की, ''शेती क्षेत्रातील पतपुरवठ्याची समस्या सोडविण्यासाठी सहकारी चळवळीचा प्रचार व प्रसार हा एकमेव कायमचा मार्ग आहे. याबाबतीत आमचे मतैक्य आहे.'' (We are in general agreement with the view that the spread of co-operative would provide the best and most lasting solution for the problem of agricultural credit in particular and of those of rural economy in general)

भारतात खालीलप्रमाणे बहुतेक राज्यात सहकारी संस्था स्थापन झाल्या ते पुढील तालिकेवरुन स्पष्ट होईल.


<u>तालिका क्रमांक १</u>

**भारतातील सहकारी चळवळीची प्रगती**

| वर्ष | सहकारी संस्थांची संख्या | सभासद संख्या (हजारात) | खेळते भांडवल (लाखात) |
|---|---|---|---|
| १९०६-०७ | ८४३ | ९०.८४ | २३.७२ |
| १९१०-११ | ५३४० | ३०५.०६ | २०३.०५ |
| १९११-१२ | ८१७७ | ४००.० | ३३५.०७ |
| १९१७-१८ | २५११२ | १०९०.०० | ७६०.०९ |
| १९२३-२४ | ५४२०३ | १७६८.०० | १६५५.०० |
| १९२८-२९ | ८७९९१ | ३००४.०० | ३२३८.०० |
| १९३८-३९ | १२२००० | ५३७०.०० | १०६४७.०० |
| १९४५-४६ | १७२००० | ९७६०.०० | १४६००.०० |

आलेखा क्रमांक १

## भारतातील सहकारी चळवळीची प्रगती




भारतात स्वतंत्र्यपूर्व काळात बहुतेक राज्यात सहकारी संस्था स्थापन झाल्या. स्वातंत्र्यपूर्व काळात वरील प्रकारच्या संस्थांत भरपूर प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. त्याचप्रमाणात सभासद संख्या व खेळत्या भांडवलात सुध्दा भरपूर प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते.

त्याचप्रमाणे स्वातंत्र्यपूर्व काळात वरील प्रकारच्या संस्थाखेरीज इतर प्रकारच्या संस्था देखील अस्तित्वात आल्या होत्या. सन १९०४ च्या कायद्यातील काही दोष व उणिवा लक्षात घेता सन १९१२ च्या नव्या कायद्यानुसार विविध बाजुनी सहकार चळवळीची प्रगती झाली. यात वरील प्रकारच्या सहकारी संस्था व्यतिरिक्त सन १९१८-१९१९ या वर्षात बिगर शेती सहकारी संस्थांची संख्या १९७१ होती, तर त्यांची सभासद संख्या २.६२ लाख होती व खेळते भांडवल रु. २.१७ कोटी होते. त्यानंतर सन १९२३-२४ मध्ये बिगर शेती सहकारी संस्थांची संख्या वाढून ४५२९ झाली. तर सभासद संख्या ५.२९ लाख व खेळते भांडवल रु. ६.३१ कोटी होते. त्यानंतर सन १९२८-२९ मध्ये ९७६१ संस्था होत्या तर ९.९२ लाख सभासद व रु. १३.६३ कोटी खेळते भांडवल होते.

वरील आकडेवारी वरुन व विवेचनावरुन असे लक्षात येते की, भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या संख्येत, सभासद संख्येत व खेळत्या भांडवलात झपाट्याने वाढ झाल्याचे दिसून येते. यावरुन एकत्रित विचार केल्यास भारतात सहकारी चळवळ सर्व बाजुंनी विकसित झाल्याचे दिसते.

या काळातील सहकारी चळवळीला वरदान म्हणजे काही निवडक कार्यकर्त्यांचा संच जसे जी.के. देवधर, वैकुंठ मेहता व रावबहादुर मालमकी, धनंजयराव गाडगीळ यांनी सहकारी चळवळीला वाहिलेले ते निस्वार्थी समाजसेवक होते.  १९४७ साली महाराष्ट्रात सहकारी संस्था ८९९० होत्या आणि त्यांची सभासद संख्या १४ लाख २१ हजार एवढी होती. तसेच खेळते भांडवल ४४ कोटी ९५ लाख एवढे होते.

### *१)स्वातंत्र्योत्तर काळ (१९४७-१९९१) :*

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सहकाराला एक नवी गती मिळाली. विकासाचे एक नवे युग सुरु झाले व विकासाच्या प्रक्रियेत सहकाराला अनन्यसाधारण स्थान मिळाले. भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात सहकारामुळे शिक्षण, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, जीवन, कृषी औद्योगिक ग्रामीण विकास आणि आर्थिक जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी नवे नवे उपक्रम तयार केले. त्यापैकी 'समाज विकास योजना' आणि 'राष्ट्रीय विस्तार योजना' हे दोन उपक्रम भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत क्रांती घडविणारे ठरले आहेत. जनतेच्या सुखी व समृध्दी जीवनाच्या प्रगतीसाठी सहकार हा एकच मार्ग आहे. १९५१ साली सुरु झालेल्या पहिल्याच पंचवार्षिक योजनेत म्हटल्याप्रमाणे भारतात मिश्र अर्थव्यवस्था राहील. खाजगी क्षेत्राचे सरसकट राष्ट्रीयकरण होणार नाही. खाजगी कृषी व उद्योग यांना स्थान राहील. कृषीला लागणाऱ्या पतपुरवठा व अन्य सेवा, कृषी मालाचे विपणन व त्यावरील प्रक्रिया, उपभोक्ता वितरण, ग्रामोद्योग, गृहनिर्माण, इत्यादी वेगवेगळ्या क्षेत्रात सहकार हेच साधन असेल. सहकारातून विकासाला दिशा व संतुलन प्राप्त होईल व आर्थिक विकास मूल्याधारित राहील. नुसती आर्थिक वाढ होणार नाही तर त्याची फळे सर्व सामान्यांनाही चाखायला मिळतील. नुसता भोगवाद न फोफावता आर्थिक व सामाजिक व्यवस्थेत बंधुभावाचाही विकास होईल असे मत अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजय गाडगीळ यांनी मांडले.

ब्रिटीशकाळात असे म्हणायचे की, शेतकरी ''कर्जात जन्मतो, कर्जात वाढतो आणि कर्जातच मरतो'' सतत त्याच्या गळ्याभोवती सावकारी पाश आवळत राहतो. सावकारी पाशातुन मुक्त करण्यासाठी सहकारी ग्रामीण पतपुरवठा व्यवस्था हाच एकमेव उपाय होय. यावर व्यापक शिफारशी करण्यासाठी रिझर्व बँकेने सनदी अधिकारी गोरेवाला यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्च स्तरीय समिती नेमली. या समितीचे प्रा. डॉ. धनंजय गाडगीळ हे सदस्य होते. या समितीने एक महत्वाचा निष्कर्ष काढला. ''सहकार आजवर अयशस्वी ठरला आहे. परंतु यापुढे तो यशस्वी झाला पाहिजे. त्यासाठी त्यांनी सुसंघटीत अशा ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेची शिफारस केली. ही व्यवस्था खालील तत्वानुसार चालावी.

१)माणसाच्या पतीनुसार कर्ज देण्याएवजी ते ज्या उद्दिष्टासाठी कर्ज हवे त्याचा विचार करुन द्यावे.''
२)कर्ज पुरेसे व वेळेवर द्यावे.
३)त्याचा सदुपयोग होईल याकडे लक्ष द्यावे.
४)शेतमालाचे उत्पादन, विपणन व प्रक्रिया याचा एकत्र विचार व्हावा.
५)शेतमालाचे विपणन करुन आलेल्या पैशातुन अल्प व मध्यमावधी कर्जाची परतफेड करावी.

अशाप्रकारच्या शिफारशी करण्यात आल्या व या शिफारशीनुसार विविध प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या व भारतातील सहकारी चळवळीची गेल्या ४०-४५ वर्षात प्रंचड  वाढ झाली आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र सहकारी चळवळीकडे सरकारने योग्य ते लक्ष पूरविले. सहकारी चळवळीचा विकास देशातील सर्व भागातून होण्याकरीता विविध प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करण्याकरिता उत्तोजन दिले गेले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विविध क्षेत्रात सहकारी चळवळ विविध अंगानी विकसित झाली आहे हे पुढील तालिकेवरुन स्पष्ट होईल.


<u>तालिका क्रमांक २</u>

भारतातील सहकारी चळवळीची प्रगती

| वर्ष | संस्था संख्या (लाखात) | सभासद संख्या (लाखात) | भागभांडवल (रु. कोटीत) | कार्यकारी भांडवल (रु. कोटीत) |
|---|---|---|---|---|
| १९४५-४६ | १.७२ | ९७.६० | ३२.०० | १४६.०० |
| १९५०-५१ | १.८० | १३७.०० | ४५.०० | २७६.०० |
| १९६०-६१ | ३.३० | ३४२.०० | २२२.०० | १३१२.०० |
| १९७०-७१ | ३.२० | ५९१.०० | ८५१.०० | ६८१०.०० |
| १९७३-७४ | ३.३० | ७३४.०० | १२२५.७८ | ९६४८.०० |

<u>आलेख क्रमांक २</u>

भारतातील सहकारी चळवळीची प्रगती




वरील आकडेवारीवरुन स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सहकारी संस्थेत वाढ झाल्याचे दिसुन येते. सहकारी चळवळीच्या विकासाचा परिणाम म्हणजे १९७३-७४ अखेर भारतातील जवळ जवळ ९३ टक्के खेडी, ४० टक्के ग्रामीण लोकसंख्या व ४३ टक्के शेतकरी कुटुंबे सहकारी क्षेत्राच्या कक्षेत आली. महाराष्ट्र, तामिळनाडू, गुजरात व केरळ या राज्यातील बहुतेक सर्वच खेड्यांतून सहकारी संस्थांचे जाळे पसरले आहे. ग्रामीण भागातील या सहकारी संस्था ग्रामीण जनतेला विविध प्रकारच्या सेवा व वस्तु यांचा पुरवठा करतात.


<u>तालिका क्रमांक ३</u>

प्राथमिक कृषी संस्थांची प्रगती

| वर्ष | संस्था संख्या (लाखात) | सभासद संख्या (लाखात) | भागभांडवल (रु. कोटीत) | कार्यकारी भांडवल (रु. कोटीत) |
|---|---|---|---|---|
| १९८०-८१ | ९४ | ५७६.५० | ५७१.१० | ४०३६ |
| १९८९-९० | ८८ | ८१२.०० | ११७४.०० | १२५७७ |
| १९२-९३ | ८३ | ८६२.०० | १२३९.०० | १५८०९ |

आलेख क्रमांक ३

प्राथमिक कृषी संस्था  ंची प्रगती




प्राथमिक कृषी संस्थात वाढ झाली नसली तरी सभासद संख्येत झालेली वाढ दिसुन येते. त्याचप्रमाणे भागभांडवलात सुध्दा वाढ झालेली आहे. त्यामुळे याचा समाजाला फार मोठा फायदाच झालेला आहे.

*१)उदारीकरणाच्या धोरणानंतरचा काळ (१९९१ नंतरचा) :*

१९९१ साली देश आर्थिक संकटात सापडल्यामुळे विश्वबँक व नाणे निधी यांच्या दबावाखाली भारताला नियोजित अर्थव्यवस्थेचा त्याग करुन मुक्त बाजार अर्थव्यवस्थेचा स्विकार करावा लागला. नियंत्रणे व अनुदाने काढून टाकणे, खाजगी धंद्यांना संपूर्ण वाव देणे, सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करणे, सरकारचा अर्थव्यवहारातील हस्तक्षेप कमी करणे इत्यादी बदल हे उदारीकरण व जागतिकीकरणामुळे झाले. त्याचाच परिणाम म्हणुन ''सहकाराचे अनन्य साधारण स्थान'' ही कल्पनाच कालबाह्य झाली. सहकारी संस्थांनी कोणत्याही अनुदानाची व उत्तेजनाची अपेक्षा न करता स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेत टिकून राहिले पाहिजे. या मुलभूत आर्थिक परिवर्तनाच्या आव्हानाला सहकारी संस्थांनी तोंड द्यावयाचे आहे.


उदारीकरणाचा कालखंड सुरु होण्याच्या आधिपासुनच सहकारी संस्था स्वायतत्तेची मागणी करीत होत्या. केवळ कायद्याने स्वायतत्ता देऊन भागणार नाही. स्वायतत्ता प्रत्यक्षात उतरायची असेल तर संस्थेत तशी क्षमता असली पाहिजे. दुर्दैवाने अलीकडच्या काळात सहकारी संस्थांत केवळ अक्षमताच नव्हे तर आर्थिक दुर्व्यवहार घडून येत असल्याचे दिसते. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने सहकारी चळवळीचे भूषण मानले जाई. आज ते संकटात सापडले आहेत. एकुण १७७ साखर कारखान्यापैकी १३ विसर्जित झाले आहेत. ५६ कारखाने आजारी आहेत. केवळ राजकीय प्रभुत्वाच्या आकांक्षेमुळे स्थापन झालेले कारखाने पुरेशा उस पुरवठ्याअभावी गळित करु शकत नाहीत. तशात मुक्त अर्थव्यवस्थेनुसार आयात केलेल्या साखरेच्या भावाच्या तुलनेशी देशी साखर महाग असल्याचे दिसत आहे.

## महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती

तालिका क्र. ४

| विवरण | १९९१ | २००१ | २००२ | २००३ | २००८ |
|---|---|---|---|---|---|
| एकूण पतसंस्था | १०४६२० | १५८७१४ | १६५७८९ | १७३४०२ | २०५७०८ |
| एकूण सभासद संख्या (लाखात) | २७० | ४३० | ४३९ | ४७६ | ४८४ |
| एकूण भागभांडवल (कोटीत) | १९७० | ७५६० | १०६७७ | १२८६५ | १२९२३ |
| एकूण कर्जवाटप (कोटीत) | ६३०० | ४३३९२ | ५८७२४ | ५५१३३ | ५७७१६ |

आलेख क्र. ४




वरील तालिका व आलेखावरून सन १९९१ ते २००८ पर्यंत महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास झालेला दिसून येते. सन १९९१ मध्ये महाराष्ट्रातील एकूण सहकारी संस्थांची संख्या १,०४,६२० होती. तर सन २००८ मध्ये वाढून २,०५,७०८ पर्यंत झाली होती. तर सभासद संख्या २७० लाखावरून ४८४ लाखापर्यंत वाढलेली दिसून येते.

सन १९९१ मध्ये वसुल भागभांडवल १९७० कोटी रुपये होती तर २००८ मध्ये १२९२३ कोटी रुपयापर्यंत वाढलेली दिसून येते. त्याचप्रमाणे एकूण कर्जवाटप ६३०० कोटी रुपयावरून ५७७१६ कोटी रुपयापर्यंत वाढलेली दिसून येते.

वरील आकडेवारीवरून महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती झालेली दिसून येते.

सहकाराचा दुसरा एक सशक्त भाग म्हणजे नागरी सहकारी बँक. गुजरात व महाराष्ट्रात या क्षेत्रात आघाडीवर होते परंतु याच राज्यातील नागरी बँकेत आर्थिक गैरव्यवहार मोठ्या प्रमाणावर झाले. सट्टेबाजारासाठी निधी वाटल्यामुळे गुजरातेतील माधवपूरा सहकारी बँक कर्जबाजारी झाली. महाराष्ट्रातील बँकांनी सरकारी रोखे खरेदी करतांना काही फसव्या व गुन्हेगारी वृत्तीच्या एजंटाबरोबर व्यवहार केल्यामुळे त्यांचे फार मोठे नुकसान  झाले. इतर काही बँकांना संचालकांनी स्वत:साठी व  स्वत:च्या नातेवाहीकासाठी भरमसाठ कर्ज घेतली. त्यांची परतफेड न केल्याने या बँका डबघाईला आल्या. हे सर्व दुर्व्यवहार लक्षात घेऊन रिझर्व बँकेने संचालक मंडळ बरखास्त करुन सरकारी निबंधकांना प्रशासक नेमावे लागले आणि रेग्युलेशन ॲक्टमध्ये फेरबदल करुन सहकारी बँकावर कडक नियंत्रण घालण्याचा प्रस्ताव आणला.

व्यक्तीगत स्वार्थ बाजुना ठेवून सामुहिक लाभासाठी कार्य करणे, नैतिक मूल्यांची जोपासना करणे, सेवाभावांचा अवलंब करणे अशा गुणांचा पुरस्कार सहकारी संस्थांनी केल्यास लोकांचा विश्वास त्या संपादन करु शकतील आणि यातच त्यांचे सामर्थ्य आहे. एकदा त्याच्या व्यवहारातील गुणवत्ता वाढली तर कोणत्याही प्रकारच्या भांडवलशाही आव्हानाला त्या सामर्थ्याने तोंड देऊन भक्कमपणे उभ्या राहू शकतात हे पाश्चात्य देशातील उदाहरणावरुन सिध्द झाले आहे.

***सारांश :***

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या व्यक्तीच्या गरजा भागविण्याच्या उद्देशाने नागरी/ग्रामीण सहकारी पतसंस्थांना पर्यायी संस्था म्हणून आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तिंना पतवान बनवुन त्यांना सक्षम व स्वयंनिर्भर बनविण्यासाठी पतसंस्था प्रामुख्याने अस्तित्वात आल्या आहेत.

भारतात सहकारी पतसंस्थांचा उगम १९ व्या शतकाच्या शेवटच्या कालखंडात झाला. सर्वप्रथम मुंबई प्रांतातील बडोदा येथे ५  फेब्रुवारी १८८१ ला ''अन्योन्य सहकारी संस्था'' स्थापन करण्यात आली. तेव्हापासून सहकारी संस्थामध्ये वाढ होऊन प्रगती झाल्याचे दिसुन येते.

भारतातील सहकारी चळवळीच्या विकासाबाबत विचार केला असता तिन कालखंड स्पष्टपणे दिसून येतात. ते खालील प्रमाणे आहेत.

१)स्वतंत्रपूर्वकाळ  (१९०४ ते १९४७)
२)स्वातंत्र्योत्तर काळ (१९४७ ते १९९१)
३)उदारीकरणानंतरचा काळ (१९९१ नंतरचा)

वरील कालखंडाचा विचार करता सन १९०४ ते २००८ पर्यंतच्या कालखंडात सहकारी पतसंस्था, सभासद संख्या व भागभांडवलात वाढ झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे कर्जवाटपामध्ये सुद्धा वाढ झाल्याचे दिसून येते. यावरून भारतातील सहकारी चळवळीचा विकास झाल्याचे स्पष्ट होते.

***संदर्भग्रंथ -***

१.प्रा. डॉ. बोंद्रे, अरविंद, प्रा. डॉ. वैरागडे, दिलीप, व्यवसाय व्यवस्थापनाची मुलतत्त्वे, पायल प्रकाशन नागपूर.
२.प्रा. रायखेलकर, ए. आर., प्रा. डांगे, अशोक, सहकार, तत्त्वे आणि व्यवहार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
३.प्रा. बोरीकर, अशोक, प्रा. कुळकर्णी, पी.आर., भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकार, विद्या प्रकाशन, नागपूर.
४.कंसाल, भारत भुषण, सहकारिता के सिध्दांत प्रथम खंड, नवयुग साहित्य सदन, आगरा.

५.डॉ. कामत, गो.स., सहकार, व्यवहार आणि व्यवस्थापन, विद्या प्रकाशन, पुणे.
६.डॉ. मित्तल, ए.सी., सहकारिता देश और विदेश में, कुमार पब्लिशिंग  हाऊस, आगरा
७.डॉ. मेमोरीया, सी.बी., डॉ. कोकर्डेकर, शरदचंद्र., डॉ. जोशी, सी.जे. मोहन, सहकार परिचय, हिमालया पब्लिशिंग हाऊस, गिरगांव मुंबइ.
८.डॉ. गुप्ता, बी.पी., भारत में सहकारिता के सिध्दांत एवं व्यवहार., बी.डी, पब्लिकेशन जयपुर, नई दिल्ली.
९.पठाण, वाय. एम., सौ. पठाण, खैरुनिसा, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१, श्री शिवाजीराव नलावडे सहकारी पत संस्था फेडरेशन मर्या.  मुंबई.
१०.सराफ, मोहन., सहकार, मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे.
११.येरवडकर, प्र.द., सहकारात व्यवसायिक व्यवस्थापनासाठी क्षमता बांधणी, सहकार सप्ताह विशेषांक, नोव्हें. २०१०
१२.श्री दंडवते, काशिनाथ किसन., ठेवी सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना, सहकार सप्ताह विशेषांक, नाव्हें. डिसें., २००४.
१३.डॉ. माथुर, बी.एस., भारत में सहकारिता, साहित्यभवन, आगरा.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net